# अस्तित्व अकॅडमी

**आठवले चेंबर्स, दुसरा मजला, दैनिक गावकरी समोर, अर्पण ब्लड बँक शेजारी**
**रेडक्रॉस सिग्नल, नाशिक मो. नं. 9822712101**

**पोलीस भरती सराव पेपर क्र-९**

**वेळ : ९० मिनिटे**
**प्रश्न : १०० : गुण - १००**

**01. 'पाणी पडणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून अचूक निवडा.**
1) उत्साहभंग होणे 2) माघार घेणे
3) नाश होणे 4) निष्फळ श्रम

**02. 'एखाद्या क्षुल्लक गोष्टीकडे वेळीच लक्ष न दिल्यास ती पुढे डोईजड होते.' या अर्थाची कोणती 'म्हण' आहे ? खालील पर्यायांतून अचूक पर्याय निवडा.**
1) थेंबे थेंबे तळे साचे
2) खायला फार अन् धरणीला भार.
3) तण - खाई धन
4) एका लबाडीच्या योगे, बहु येती तिच्या मागे

**03. 'तंबाखू' हा शब्द कोणत्या भाषेतील आहे ?**
1) फारसी 2) पोर्तुगीज
3) अरबी 4) हिंदी

**04. खालीलपैकी 'कमळ' या शब्दाचे तीन पर्याय बरोबर असून एक पर्याय चूक आहे, तो कोणता ते लिहा.**
1) कुमुद 2) पंकज
3) कुसुम 4) नलिनी

**05. खालीलपैकी तीन शब्द समानार्थी असून एक शब्द त्यांचा समानार्थी नाही, तो कोणता ? ते लिहा.**
1) हय 2) वारू
3) गज 4) तुरंग

**06. पर्यायी उत्तरांतील 'मराठी उपसर्ग' असलेला शब्द कोणता ?**
1) कमजोर 2) फटकळ
3) गैरसोय 4) सरकार

**07. 'पंतप्रधानांनी राष्ट्रीय ऐक्याचे महत्व सांगितले.' या केवलवाक्याचे मिश्रवाक्यात कसे रूपांतर होईल ? पुढील पर्यायांपैकी अचूक पर्याय निवडा.**
1) राष्ट्रीय ऐक्याचे महत्व पंतप्रधानांनी सांगितले.
2) पंतप्रधानांनी सांगितले की, राष्ट्रीय ऐक्य महत्वाचे आहे.
3) राष्ट्रीय ऐक्य महत्वाचे आहे असे पंतप्रधान म्हणाले.
4) पंतप्रधान म्हणाले, राष्ट्रीय ऐक्य महत्वाचे आहे.

**08. शुध्दलेखनाच्या नियमानुसार पर्यायी उत्तरांतील व्याकरणदृष्ट्या योग्य शब्द कोणता ?**
1) औद्योगीकरण 2) औद्योगिकरण
3) उद्योगीकरण 4) उद्योगिकरण

**09. धातुखेरीज इतर शब्दांना प्रत्यय लागून- जे नवीन शब्द तयार होतात त्यांना काय म्हणतात ?**
अ) धातुसाधिते ब) कृदन्ते
क) तद्धिते ड) सिद्ध शब्द
**पर्यायी उत्तरे :-**
1) अ आणि क बरोबर 2) ब आणि अ बरोबर
3) फक्त क बरोबर 4) ड आणि अ बरोबर

**10. 'भूक लागल्यामुळे राजू इतरांच्या आधी जेवला' या केवलवाक्याचे मिश्रवाक्यात पुढीलप्रमाणे रूपांतर होईल. अचूक पर्याय निवडा.**
1) भूक लागली म्हणून राजू इतरांच्या आधी जेवला.
2) राजू इतरांच्या आधी जेवला कारण त्याला भूक लागली.
3) इतरांच्या आधी राजू जेवला, त्याला भूक लागली होती.
4) राजूला भूक लागली म्हणून राजूने इतरांच्या आधी जेवण केले.

**11. पर्यायी उत्तरांतील वाक्यातील कृदंत असलेले वाक्य ओळखा.**
1) तो हळूहळू चालतो.
2) तो बसत बसत म्हणाला.
3) त्याच्या मागोमाग गेला.
4) छी छी ! किती धाणेरडा हा शर्ट !

**12. पुढील विधाने वाचून योग्य उत्तर लिहा.**
अ) क्रियापदांना काळ व अर्थ यांचे विकार होतात.
ब) कधी कधी वर्तमानकाळाच्या किंवा भूतकाळाच्या क्रियापदावरून भविष्यकाळाचा आशय व्यक्त होतो.
क) संकेतार्थी क्रियापदे भूतकाळी असतात.
**पर्यायी उत्तरे :-**
1) फक्त ब व क चूक 2) फक्त ब बरोबर
3) फक्त क चूक 4) फक्त अ व क बरोबर

**13. 'अव्ययसाधित विशेषण' असलेले विधान पर्यायी उत्तरात कोणते आहे ?**
1) बोलक्या बाहुल्यांचा खेळ सर्वांनाच आवडतो.
2) आज तुम्ही कोणत्या गावाला जाणार ?
3) बनारसी बोरे रसाळ असतात.
4) ते गव्हाचे पोते पुढच्या माळीत ठेव.

**14. 'हात दाखवणे' या वाक्प्रचाराचा अर्थ -**
1) विजयाची खूण करणे. 2) अभिवादन करणे.
3) निरोप घेणे 4) चोप देणे

**15. लेखननियमांनुसार खालील कोणता शब्द अचूक आहे?**

अस्तित्व अकॅडमी

1) उपरोल्लिखित 2) ऊपरोल्लिखित
3) उपरोल्लिखीत 4) उपरोलिखित

**16. खालील गट अ व गट ब मधील एक जोडी चुकीची आहे, ती पर्यायी उत्तरांतून शोधा.**

| 'अ' (उदाहरणे) | 'ब' (उभयान्वयी अव्यये) |
|---|---|
| अ) म. गांधी म्हणत, की सर्वांनी सत्याने वागावे. | i) विकल्पबोधक |
| ब) तो इतका रडला की, त्याचे तोंड सुजले. | ii) न्यूनत्वबोधक |
| क) यश मिळो, की न मिळो मी प्रयत्न करणार | iii) परिणामबोधक |
| ड) माझा पहिला नंबर आला, की मी पेढे वाटीन. | iv) स्वरुपदर्शक |

**पर्यायी उत्तरे :-**
1) अ - iv 2) ब - iii
3) क - i 4) ड - ii

**17. 'समुद्र' या शब्दाला खालीलपैकी समानार्थी शब्द कोणता ?**
1) अर्णव 2) वडवानळ
2) खग 4) सागरवेळा

**18. 'शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतात.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.**
1) शक्य क्रियापद 2) द्विकर्मक क्रियापद
3) प्रयोजक क्रियापद 4) अकर्तृक क्रियापद

**19. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्दांचे लेखन अचूक आहे ?**
1) ज्यादा, सफेद, अंध:कार
2) महत्व, धि:कार, उत्कृष्ठ
3) तत्व, दूसरा, जेष्ट
4) कोट्यधीश, घनश्याम, मदत

**20. 'कमळ आणि बेडूक दोघेही चिखलात उत्पन्न झालेले म्हणजे ..... असतात.' रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडा.**
1) बंधू 2) समानशील
3) पंकज 4) अंबुज

**21. पुढील विधाने कोणत्या काळातील आहेत ? ती अ,ब, क, या क्रमानुसार लावा.**
**अ) मी अभ्यास करीन.**
**ब) तो मुलगा खेळत आहे.**
**क) मी अभ्यास केला.**
**पर्यायी उत्तरे :-**
1) भूतकाळ, भविष्यकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ
2) भविष्यकाळ, भूतकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ
3) भूतकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ, भविष्यकाळ
4) भविष्यकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ, भूतकाळ

**22. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द देशी आहेत ?**
1) इलाखा, खुशाल, मजूर 2) घोडा, डाहळी, पोट
3) वहाण, रक्त, तूप 4) कोठार, शेत, सोने

**23. 'मन:पटल' हा जोडशब्द खालीलपैकी कोणत्या जोडशब्दातून बनला आहे ?**
1) मन + पटल 2) मनहा + पटल
3) मनस् + पटल 4) मनो + पटल

**24. जी कर्मे क्रियापदावर अधिकार गाजवणारी असतात, त्यांना कोणत्या प्रकारची कर्मे म्हणतात ?**
1) अप्रत्यक्ष कर्मे 2) प्रभावी कर्मे
3) प्रत्यक्ष कर्मे 4) पूरक

**25. पुढील शब्दांची संधी फोड करा.**
**'निरिच्छ'**
1) नि : + च्छ 2) निर: + इच्छ
3) नि:+ इच्छ 4) निरी + च्छ

**26. कौशल्य विकास अभियानाचे राजदूत कोण आहेत ?**
1) अमिताभ बच्चन व प्रियंका चोप्रा
2) रणवीर सिंह व दिपीका पदूकोन
3) अक्षय कुमार व अलिया भट
4) वरूण धवन व अनुष्का शर्मा

**27. गायीला राष्ट्रमाता म्हणून घोषित करणारे देशातील पहिले राज्य कोणते ?**
1) उत्तर प्रदेश 2) उत्तराखंड
3) हरियाणा 4) महाराष्ट्र

**28. देशातील पहिले 'डॉग पार्क' कोणत्या शहरात उघडण्यात आले आहे ?**
1) जयपूर 2) पटना
3) हैद्राबाद 4) चेन्नई

**29. रेखा शर्मा यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. राष्ट्रीय महिला एक वैधानिक संस्था आहे. तर या संस्थेचे मुख्यालय.....येथे आहे.**
1) मुंबई 2) दिल्ली
3) कोलकात्ता 4) हैद्राबाद

**30. मानव विकास अहवाल 2018 मधील जगातील 189 देशांच्या यादीत भारत .....स्थानावर आहे.**
1) 100 2) 130
3) 120 4) 150

**31. 'आयुष्मान भारत' या योजनेबाबत अयोग्य विधान कोणते?**
1) या योजनेत केंद्र सरकार 60% व राज्य सरकार 40% वाटा उचलते.
2) केरळ, ओदिशा, पंजाब, तेलंगणा आणि दिल्ली वगळता सर्व राज्य सहभागी.
3) अमेरिकेतील 'ओबामा केअर' योजनेच्या धर्तीवर ही योजना भारतात सुरू करण्यात आली.
4) या योजनेत दारिद्रयरेषेखालील कुटूंबीयांना प्रतिवर्षे 10 लाख रूपयापर्यंत उपचार मोफत आहे.

अस्तित्व अकॅडमी

**32. 'लू' हे कोरडे आणि धुळीचे वारे भारताच्या वायव्य भागातून वाहणारे महिने**

1) एप्रिल-मे 2) मे-जून
3) जून-जुलै 4)ऑक्टोबर-नोव्हेंबर

**33. खालीलपैकी कोणते वाक्य बरोबर आहे ?**

1) भारतात साक्षरतेचे प्रमाण पुरूषांपेक्षा स्त्रीयांत जास्त आहे.
2) अंदामान-निकोबार येथे साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी आहे.
3) भारतात साक्षरता कमी होत आहे.
4) वरील एकही नाही.

**34. खालीलपैकी अयोग्य प्रतिपादन निवडा.**

1) महानदी छत्तीसगढ मध्ये उगम पावते.
2) गोदावरी नदी महाराष्ट्रात उगम पावते.
3) कावेरी नदी आंध्रप्रदेशात उगम पावते.
4) तापी नदी मध्यप्रदेशात उगम पावते.

**35. 'मीठाची नदी' म्हणून खालीलपैकी कोणती नदी ओळखली जाते ?**

1) मही 2) लुनी
3) साबरमती 4) तापी

**36. तारापूर प्रकल्पासंबंधी कोणती विधाने बरोबर आहेत ?**

अ) भारतातमधील पहिला अणुऊर्जा प्रकल्प.
ब) आशियामधील सर्वात मोठा अणुऊर्जा प्रकल्प
क) अमेरिका तंत्रावर आधारित भारतातील पहिला अणुऊर्जा प्रकल्प
ड) फ्रान्सच्या सहाय्याने अनुऊर्जा प्रकल्पाची सुरूवात.

**पर्यायी उत्तरे :-**

1) अ, ब, क 2) अ, ब 3) ड, क 4) अ, क, ड

**37. पुढीलपैकी कोणती जोडी चुकीची आहे ?**

1) शोषणाविरूद्धचा हक्क - कलम 23 व 24
2) समानतेचा हक्क - कलम 14 ते 18
3) धर्मस्वातंत्र्याचा हक्क - कलम 25 ते 28
4) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क - कलम 32

**38. पुढीलपैकी कोणत्या कलमानुसार आणीबाणी लागू करण्यात येते?**

1) 360 2) 356
3) 352 4) वरीलपैकी सर्व

**39. मूलभूत कर्तव्यांचा राज्यघटनेमध्ये समावेश कोणत्या समितीच्या शिफारशीनुसार करण्यात आला ?**

1) सरदार स्वर्णसिंह समिती 2) सरकारीया समिती
3) जी व्ही के समिती 4) अशोक मेहता समिती

**40. .....निधीतून खर्च करण्यासाठी संसदेच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता नसते.**

1) संचित 2) आकस्मिकता
3) लेखानुदान 4) वरीलपैकी नाही.

**41. सर्वोच्च न्यायालयाची कार्यपद्ध संसदेच्या मान्यतेने स्वतः सर्वोच्च न्यायालय ठरवू शकते. ही तरतूद घटनेच्या कोणत्या कलमामध्ये समाविष्ट आहे ?**

1) 143 2) 144
3) 145 4) 146

**42. पुढीलपैकी कोणाचा विधानपरिषदेच्या मतदारांमध्ये समावेश होतो ?**

अ) राज्यपाल
ब) स्थानिक स्वराज्य संस्थांचे निर्वाचित सदस्य
क) शिक्षक
ड) विधानसभेचे निर्वाचित सदस्य
इ) पदवीधर

**पर्यायी उत्तरे :-**

1) अ, ब, क, ड 2) ब, क, ड, इ
3) अ, क, ड, इ 4) वरील सर्व

**43. 4501 ते 6000 लोकसंख्या असलेल्या गावाच्या ग्रामपंचायतीची सदस्य संख्या किती ?**

1) 9 2) 11
3) 13 4) 15

**44) पुढीलपैकी कोणता शब्द सरनाम्यामध्ये 42 व्या घटनादुरूस्तीने समाविष्ट करण्यात आला ?**

1) एकात्मता 2) धर्मनिरपेक्ष
3) समाजवादी 4) वरील सर्व

**45. चंपारण सत्याग्रहाच्या दरम्यान.....यांनी महात्मा गांधींचे मराठी चरित्र लिहिले ?**

1) अवंतिकाबाई गोखले 2) आनंदी वैशंपायन
3) दुर्गाबाई देशमुख 4) यापैकी नाही.

**46. हिंदूस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन (H.S.R.A) च्या घोषणापत्राचे नाव काय होते ?**

1) द फिलॉसॉफी ऑफ बॉम्ब 2) इन्कलाब जिंदाबाद
3) अ रिव्हाल्यूशनरी 4) यापैकी नाही.

**47. महाराष्ट्रातील पुढीपैकी कोणत्या ठिकाणी जंगल सत्याग्रह केले गेले ?**

**अ) बिळाशी ब) पुसद**
**क) कळवण ड) वडाळा**

**पर्यायी उत्तरे :-**

1) केवळ अ, ब 2) अ, ब, आणि क
3) ब, क आणि ड 4) वरीलपैकी सर्व

**48. 'मराठा' या इंग्रजी वृत्तपत्राचे पहिले संपादक कोण होते?**

1) लोकमान्य टिळक 2) गो.ग. आगरकर
3) गो. कृ. गोखले 4) विष्णुशास्त्री चिपळूणकर

**49) राजर्षी शाहू महाराजांच्या राज्यभिषेकासाठी पुढीलपैकी कोणती व्यक्ती हजर नव्हती ?**

1) आर. जी. भांडारकर 2) गो. ग. आगरकर
3) गो. कृ. गोखले 4) लोकमान्य टिळक

**50. खालीलपैकी कोणत्या जीवनसत्वाची निर्मिती मानवी शरीरामध्ये होते?**

1) नियासिन ($B_3$) 2) कॅल्सिफेरॉल (D)
3) 1 व 2 दोन्ही 4) यापैकी नाही.

अस्तित्व अकेडमी

**51. दिलेल्या संख्या श्रेणीतील क्रमाने येणारे नंतरचे पद कोणते?**

**3, 1, 4, 2, 5, 4, 6, 7**

1) 7 2) 4

3) 5 4) 10

**52) प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.**

**Kl, LH, MG, NF, ?**

1) PA 2) OE

**51. 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांचा खालीलपैकी योग्य उतरता क्रम कोणता ?**

1) ठाणे, मुंबई उपनगर, पुणे, नाशिक, नागपूर

2) ठाणे, पुणे, मुंबई, उपनगर, नाशिक, नागपूर

3) ठाणे, मुंबई उपनगर, पुणे, नागपूर, नाशिक

4) ठाणे, पुणे, मुंबई, उपनगर, नागपूर, नाशिक

**52. 1 एप्रिल 2018 पासून कोणत्या राज्यातून लष्करीदल विशेष कायदा 'अफस्फा' मागे घेण्यात आला.**

1) मिझोराम 2) मेघालय

3) नागालँड 4) जम्मू-काश्मिर

**53. 2011 च्या जनगणनेनुसार धर्मनिहाय लोकसंख्येचा योग्य उतरता क्रम कोणता ?**

1) हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, जैन

2) हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, बौध्द, जैन

3) हिंदु, मुस्लीम, ख्रिश्चन, बौध्द, शीख, जैन

4) हिंदु, मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, जैन

**54. भारतीय क्रांतीकारी संघटनांच्या अपयशाची प्रमुख कारणे कोणती ?**

अ) क्रांतीकारकांमध्ये एकसुत्रता नव्हती.

ब) इंग्रज व क्रांतीकारक हा लढा विसंगत होता.

क) लढा देण्यास योग्य ती शस्त्रास्त्रे व दारुगोळा नव्हता.

ड) क्रांतीकारकांनी दहशत निर्माण केली.

**पर्यायी उत्तरे :-**

1) फक्त अ 2) वरीलपैकी सर्व

3) फक्त अ आणि क 4) फक्त ब आणि ड

**55. गव्हर्नर जनरल बाबतीत योग्य विधान कोणते ?**

अ) ब्रिटिश पंतप्रधानांद्वारे 5 वर्षासाठी नियुक्ती.

ब) कौन्सिल सदस्य व मंत्री यांच्या सहाय्याने त्याला कामकाज करावे लागे.

क) बहुतेक राखीव / महत्वाची खाती गव्हर्नर जनरल च्या खास अधिकार क्षेत्रात होते.

ड) मंत्र्याचा निर्णय नाकारण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला होता.

**पर्यायी उत्तरे :-**

1) फक्त अ, ब, क योग्य 2) फक्त ब, क, ड योग्य

3) फक्त क, ड, अ योग्य 4) सर्वच विधाने योग्य

**56. पुढीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

अ) मुंबई, मद्रास व बंगाल या प्रांतांना इलाखे (Presidencies) असे संबोधले जाई.

ब) इतर प्रांतांना Provinies असे संबोधले जाई.

क) बंगाल, मुंबई, मद्रास प्रांताच्या प्रमुखास गव्हर्नर संबोधले जाई.

ड) इतर प्रांताच्या प्रमुखास लेफ्टनंट गव्हर्नर किंवा चिफ कमिशनर असे संबोधले जाई.

**पर्यायी उत्तरे :-**

1) अ व क 2) ब व ड

3) वरील सर्व 4) अ, ब व क

**57. अ) अर्थविषयक विधेयक राष्ट्रपती नाकारू शकतात.**

**ब) अर्थविषयक विधेयक मांडण्यापूर्वी राष्ट्रपतींची मान्यता घ्यावी लागते.**

1) अ व ब बरोबर असून ब हे अ चे योग्य कारण आहे.

2) अ व ब बरोबर पण ब हे अ चे कारण नाही.

3) अ बरोबर आहे तर ब चूक आहे.

4) अ चूक आहे तर ब बरोबर आहे.

**58. योग्या जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| अ) बलवंतराय मेहता समिती | i) विकेंद्रीकरणाच्या प्रशासकीय संरचनेची शिफारस |
| ब) वसंतराव नाईक समिती | ii) महाराष्ट्र पंचायत राज्य संरचना कशी राबवावी याबाबत |
| क) ल. ना. बोंगिरवार समिती | iii) पंचायत समितीत अनूसूचित जाती व जमातींचे प्रभुत्व असावे. |
| ड) पी. बी. पाटील समिती | iv) पंचायत राज पुनर्विलोकन समिती |

**पर्यायी उत्तरे :-**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | i | ii | iv | iii |
| 2) | i | ii | iii | iv |
| 3) | ii | iii | i | iv |
| 4) | ii | iii | iv | i |

**59. निवडणुक आयोगाचे कार्य व त्यासंबंधीत कलमे यांच्या जोड्या योग्य प्रकारे ओळखा.**

| **आयोगाचे कार्य** | **कलम** |
|---|---|
| अ) मतदार यादी तयारी करणे | i) 324 |
| ब) मतदानात सर्व नागरिक समान | ii) 325 |
| क) स्वतंत्र निवडणूक आयोग | iii) 326 |
| ड) निवडणूका प्रौढ मतदानाच्या आधारावर | iv) 327 |

**पर्यायी उत्तरे :-**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | ii | iii | i |
| 2) | iv | ii | i | iii |
| 3) | ii | iv | i | iii |
| 4) | ii | iv | iii | i |

**60. ब्रिक्स संघटनेचे मुख्यालय कुठे आहे ?**

1) दिल्ली 2) काठमांडू
3) शांघाय 4) बिजिंग

**61. 2018 सालासाठी ऑक्सफर्डने ' वर्ड ऑफ द ईअर म्हणून कोणता शब्द घोषित केले ?**
1) टूथ 2) युथक्वेक
3) आधार 4) टॉक्सिक

**62. देशातील पहिले धुरमुक्त राज्य कोणते बनले ?**
1) सिक्किम 2) केरळ
3) त्रिपूरा 4) पंजाब

**63. 'कृष्णकिनारा' हा काव्यसंग्रह कोणाचा आहे ?**
1) प्र.के. अत्रे 2) अरूणा ढेरे
3) राम मतकरी 4) प्रभा अत्रे

**64. जागतिक पासपोर्ट निर्देशांकात भारताचा कितवा क्रमांक लागतो ?**
1) 66 2) 67
3) 69 4) 102

**65. उद्योग सुलभतेत 2018 सालासाठी भारताचा कितवा क्रमांक लागतो ?**
1) 77 2) 100
3) 97 4) 150

**66. हॉकी विश्वचषक स्पर्धा 2018 मध्ये एकूण किती संघ सहभागी होणार आहेत ?**
1) 16 2) 18
3) 15 4) 20

**67. जमाल खशोगी कोण होते ?**
1) अभिनेता 2) पत्रकार
3) खेळाडू 4) राजकारणी

**68. आशियाई क्रिकट परिषदेच्या अध्यक्षपी कोणाची निवड झाली ?**
1) नझमूल हसन 2) अहमद सोची
3) हसन फरहान 4) शाकिब -अल-हसन

**69. 2018 च्या ATP टेनिस स्पर्धेचा विजेचा अलेक्झांडर इ्वेरेव हा कोणत्या देशाचा टेनिसपटू आहे ?**
1) जपान 2) जर्मनी
3) फ्रान्स 4) अर्जेटिना

**70. छत्तीसगड विधानसभा मतदान किती टप्प्यात पार पडले?**
1) 1 2) 2
3) 3 4) 4

**71. 2018 चे बोली भाषा साहित्य संमेलन कुठे पार पडले ?**
1) पुणे 2) यवतमाळ
3) मुंबई 4) नागपूर

**72. मुन जेई इन कोणत्या देशाचे राष्ट्राध्यक्ष आहेत ?**
1) उत्तर कोरिया 2) मंगोलिया
3) दक्षिण कोरिया 4) यापैकी नाही.

**73. भारतात सध्या असणारे एकूण राजकीय राष्ट्रीय पक्ष किती आहेत ?**
1) 5 2) 6
3) 7 4) 8

**74. 'अ सेंच्युरी इज नॉट इनफ' हे कोणत्या भारतीय क्रिकेट खेळाडूचे आत्मचरित्र आहे ?**
1) महेंद्रसिंग धोनी 2) विराट कोहली
3) सौरभ गांगुली 4) सचिन तेंडूलकर

**75. भारताच्या डिफेन्स रिसर्च ॲण्ड डेव्हलमेंट ऑर्गनायझेशन या संस्थेने युद्धनौकांच्या संरक्षणासाठी विकसित केलली स्वदेशी संरक्षण यंत्रणा कोणती आहे?**
1) मारिच 2) अवॅक्स
3) तेजस 4) धनुष

**76. भारताची सुपर मॉम म्हणून ओळखली जाणारी महिला बॉक्सींग खेळाडू कोण आहे ?**
1) सानिया मिर्झा 2) ज्वाला गुट्टा
3) सायना नेहवाल 4) मेरी कोम

**77. नागपूर- मुंबई दरम्यान 'महाराष्ट्र समृध्दी महामार्ग' बांधण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे, हा महामार्ग किती किमीचा आहे ?**
1) 710 किमी 2) 620 किमी
3) 420 किमी 4) 915 किमी

**78.** $20\frac{1}{2}+30\frac{1}{3}-15\frac{1}{6}=?$

1) $35\frac{2}{3}$ 2) $35\frac{2}{5}$

3) $33\frac{2}{7}$ 4) $33\frac{2}{8}$

**79.** $\left(3+1\sqrt{5}\right)\left(3-1\sqrt{5}\right)=$

1) 2 2) 4

3) $\sqrt{2}$ 4) $\sqrt{3+5}$

**80. प्रफुल्लचे आजचे वय आशिषच्या आजच्या वयाच्या दुप्पटीपेक्षा 3 ने जास्त आहे. आशिषचे 5 वर्षानंतरचे वय 15 वर्ष असल्यास प्रफुल्लचे आजचे वय किती ?**
1) 23 2) 24
3) 25 4) 26

**81. ऋतुजाचा पगार 20% ने कमी केला तर मूळ पगार आणण्यासाठी ऋतुजाच्या पगारात किती टक्के वाढ करावी लागेल ?**
1) 20% 2) 25%
3) 15% 4) 30%

**82.** $(x)^{\frac{2}{3}}=9$ **तर x ची किंमत किती ?**

अभिलाषा अकॅडमी

1) 27 2) 81
3) 9 4) 3

**83. एक वस्तु 960 रूपयामध्ये विकल्यामुळे 20% तोटा होतो. तर 20% नफा कमविण्यासाठी ती वस्तु किती रूपयांना विकावी ?**

1) 1440 रूपये 2) 1420 रूपये
3) 1200 रूपये 4) 1400 रूपये

**84. खालीलपैकी असत्य विधान कोणते ?**

**अ) चौकानाच्या संमुख म्हणजे समोरासमोरील बाजूंमध्ये सामाईक शिरोबिंदू असतो.**

**ब) चौकोनाच्या संमुख कोनांचे शिरोबिंदू जोडणारे रेषाखंड म्हणजे चौकोनाचे कर्ण असतात.**

**पर्यायी उत्तरे :-**

1) फक्त अ 2) फक्त ब
3) अ व ब दोन्ही 4) यापैकी नाही

**.85. जर MONDAY म्हणजे JAIPUR आणि TUESDAY म्हणजे UDARPUR तर SUNDAY म्हणजे काय ?**

1) RAIPUR 2) DIRPUR
3) RIDPUR 4) RUPPUR

**86) A- B चा अर्थ आहे. A, B ची मुलगी आहे.**
**A + B चा अर्थ आहे. A, B ची पत्नी आहे.**
**$A \div B$ चा अर्थ आहे. A, B चे वडील आहे.**
**$A \times B$ चा अर्थ आहे. A, B चा पुत्र आहे.**
**तर $M \times N - P$ या संबंधात M चा P शी संबंध काय ?**

1) वडील 2) आजोबा
3) नातू 4) बहिण

**87. राजेश उत्तरेकडे तोंड करून उभा होता. तेथून तो शुक्रताऱ्याच्या दिशेने 10 मीटर अंतर चालत गेला. तेथून तो दक्षिणेकडे 10 मीटर चालत गेला. तेथून पुन्हा उजवीकडे वळून तो 20 मीटर चालला. तर तो आता सुरूवातीच्या ठिकाणाच्या कोणत्या दिशेला आहे ?**

1) आग्नेय 2) नैर्ऋत्य
3) दक्षिण 4) ईशान्य

**88. विलास हा अशोकपेक्षा तीन दिवसांनी लहान आहे, जर विलासचा जन्म शनिवारी झाला असेल तर अशोकचा जन्म कोणत्या वारी झाला असेल ?**

1) मंगळवार 2) बुधवार
3) सोमवार 4) रविवार

**89. मोहन, मालन, कमल, रोहन आणि प्रिती एका पंचकोनी टेबलाच्या प्रत्येक कोनावर बसले आहेत. मोहन, रोहनच्या समोर बसला आहे. त्याच्या दोन्ही बाजूस कमल आणि प्रिती बसलेल्या आहेत. मालन ही कमल आणि रोहनच्या मध्ये पण प्रितीच्या समोर आहे. त्यांची बैठक व्यवस्था घटिवत दिशेने कोणत्या क्रमाने असेल ? बैठक क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.**

**मोहन (1), मालन (2), कमल (3), रोहन (4), प्रिती (5)**

1) 5, 1, 3, 2, 4 2) 5, 1, 3, 4, 2
3) 5, 1, 4, 3, 2 4) 5, 1, 2, 3, 4

**90. एक माणूस वायव्येकडे तोंड करून उभा आहे. तो घड्याळाच्या काट्याच्या दिशेने 90 वळतो आणि नंतर घड्याळाच्या काट्याच्या विरूध्द दिशेला 135 वळतो, तर आता तो कोणत्या दिशेकडे बघत आहे ?**

1) पूर्व 2) पश्चिम
3) उत्तर 4) दक्षिण

**91. A, B, C, D आणि E हे पाच वेगवेळ्या पण त्याच क्रमाने नसलेल्या P, Q, R, S आणि T शहरातील व्यक्ती आहेत. त्यांच्यापैकी प्रत्येकजण वेगवेळ्या शहरातून येतो. याबाबत आणखी माहिती अशी की,**

1) B आणि C हे Q शहरातील नाहीत.
2) B आणि E हे P आणि R शहरातील नाहीत.
3) A आणि C हे R, S आणि T शहरातील नाहीत.
4) D आणि E हे Q आणि T शहरातील नाहीत.

**खालीलपैकी कोणते विधान वरील माहितीनुसार सत्य नाही ?**

1) C हा P शहरातील आहे
2) D हा R शहरातील आहे
3) A हा Q शहरातील आहे
4) B हा S शहरातील आहे

**92. 23 म्हणजे 'सुंदर मुलगा', 234 म्हणजे 'सुंदर मुलगा पोहतो' आणि 1245 म्हणजे 'सुंदर मुलगी पाण्यात पोहते'. सुंदर या शब्दासाठी कोणता अंक आला आहे ?**

1) 4 2) 1
3) 3 4) 2

**93. विसंगत शब्द ओळखा.**

1) सहारा : आफ्रिका 2) थर : भारत
3)कलहारी : अमेरिका 4) गोबी : मंगोलिया

**94. मानसशास्त्राचा संबंध वर्तनाशी, तर पुरातत्वशास्त्राचा संबंध कशाशी ?**

1) मुल 2) ऐतिहासिक स्मारक
3) कमानी 4) जुन्या संरचना

**95. खालील मालिका पूर्ण करा**

aabba, abbaa, bbaaa. _____

1) baaab 2) abbab
3) ababa 4) abaab

**96. एका सभागृहात खुर्च्यांच्या 35 रांगा आहेत. पहिल्या रांगेत 20 खुर्च्या आहेत. दुसऱ्या रांगेत 22 खुर्च्या आहेत.**

अस्तित्व अॅकॅडमी

**तिसऱ्या रांगेत 24 खुर्च्या आहेत ; तर 25 व्या रांगेत किती खुर्च्या आहेत ?**

1) 62 2) 66

3) 68 4) 72

**97. एका क्रिकेटपटूने आपल्या पहिल्या पाच कसोटीत खालील धावा काढल्या = 184, 109, 114, 115, 111 त्याने आपल्या सहाव्या कसोटीत किती धावा काढल्या, तर त्याची सहा कसोटींतील धावांची सरासरी 150 होईल?**

1) 258 2) 261

3) 264 4) 267

**98. 'ऊर्जा : ज्यूल' यांसारख्या संबंध असणारी जोडी कोणती**

1) ध्वनी : पास्कल 2) शक्ती : ॲम्पीअर

3) रोध : ओहम 4) कार्य : न्यूटन

**99. पुढीलपैकी विसंगत पद ओळखा.**

1) CALORIC 2) DRUID

3) LEVEL 4) FRETFUL

**100. पाच मित्र A, B, C, D व E पैकी प्रत्येकाने एका परीक्षेत वेगवेगळे गुण प्राप्त केले. C ने D पेक्षा जास्त गुण प्राप्त केले पण E एवढे प्राप्त केले पण B पेक्षा कमी गुण प्राप्त केले. तर यांपैकी सर्वात जास्त गुण मिळविणारी तिसरी व्यक्ती कोण ?**

**1) B 2) A**

**3) C 4) माहिती अपुरी आहे.**

अहिल्या अॅकॅडमी

## उत्तरसूची

| प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 1 | 33 | 4 | 65 | 1 | 97 | 4 |
| 02 | 3 | 34 | 3 | 66 | 1 | 98 | 3 |
| 03 | 2 | 35 | 2 | 67 | 2 | 99 | 4 |
| 04 | 3 | 36 | 1 | 68 | 1 | 100 | 4 |
| 05 | 3 | 37 | 4 | 69 | 2 | | |
| 06 | 2 | 38 | 4 | 70 | 2 | | |
| 07 | 2 | 39 | 1 | 71 | 1 | | |
| 08 | 3 | 40 | 2 | 72 | 3 | | |
| 09 | 3 | 41 | 3 | 73 | 3 | | |
| 10 | 2 | 42 | 2 | 74 | 3 | | |
| 11 | 2 | 43 | 3 | 75 | 1 | | |
| 12 | 3 | 44 | 4 | 76 | 4 | | |
| 13 | 4 | 45 | 2 | 77 | 1 | | |
| 14 | 4 | 46 | 3 | 78 | 1 | | |
| 15 | 1 | 47 | 2 | 79 | 1 | | |
| 16 | 4 | 48 | 1 | 80 | 1 | | |
| 17 | 1 | 49 | 4 | 81 | 2 | | |
| 18 | 2 | 50 | 3 | 82 | 1 | | |
| 19 | 4 | 51 | 1 | 83 | 1 | | |
| 20 | 3 | 52 | 2 | 84 | 1 | | |
| 21 | 4 | 53 | 1 | 85 | 1 | | |
| 22 | 2 | 54 | 2 | 86 | 3 | | |
| 23 | 3 | 55 | 4 | 87 | 1 | | |
| 24 | 3 | 56 | 3 | 88 | 2 | | |
| 25 | 3 | 57 | 4 | 89 | 1 | | |
| 26 | 4 | 58 | 2 | 90 | 2 | | |
| 27 | 2 | 59 | 2 | 91 | 4 | | |
| 28 | 3 | 60 | 3 | 92 | 4 | | |
| 29 | 2 | 61 | 4 | 93 | 3 | | |
| 30 | 2 | 62 | 2 | 94 | 2 | | |
| 31 | 4 | 63 | 2 | 95 | 1 | | |
| 32 | 2 | 64 | 1 | 96 | 3 | | |